# महाराष्ट्र लोकसेवा आयोग


मुख्य कार्यालय : ५, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षी कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई-४०००२१, दूरध्वनी - २२७९५९००

फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी : २२१०२२२२

E-mail ID : contact-secretary@mpsc.gov.in Website - https://mpsc.gov.in, https://mpsconline.gov.in


धारिका क्रमांक : ८३७(३)(२८)/२०८६/दहा दिनांक : १३ ऑगस्ट, २०२१

महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाअंतर्गत येणाऱ्या खाली नमूद संवर्गाच्या एकूण ८१२ पदांवरील भरतीकरिता विहित ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | जाहिरात क्रमांक | पदाचे नाव | एकूण पदे |
|---|---|---|---|
| १ | २५/२०२१ ते ३५/२०२१ | विविध विषयातील सहायक प्राध्यापक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-ब (राजपत्रित) (अतिविशेषीकृत पदे) | ९० |
| २ | ३६/२०२१ | प्रशासकीय वैद्यकीय अधिकारी (होमिओपॅथी), आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई, गट-अ | १ |
| ३ | ३७/२०२१ ते ५८/२०२१ | विविध विषयातील सहायक प्राध्यापक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-ब (राजपत्रित) | ७२१ |

२. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीप्रक्रियेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनाद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेल्या माहितीचे तसेच सविस्तर जाहिरातीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती अधिकृत समजण्यात येईल.

३. सविस्तर जाहिरात आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

४. उपरोक्त अनुक्रमांक १ व २ येथील जाहिरातीसाठी आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे (https://mpsconline.gov.in) दिनांक १२ ऑगस्ट, २०२१ रोजी दुपारी १४.०० ते ०१ सप्टेंबर २०२१ रोजी २३:५९ वाजेपर्यंत अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

५. उपरोक्त अनुक्रमांक ३ येथील जाहिरातीसाठी आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे (https://mpsconline.gov.in) दिनांक १३ ऑगस्ट, २०२१ रोजी दुपारी १४.०० ते ०२ सप्टेंबर २०२१ रोजी २३:५९ वाजेपर्यंत अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

ठिकाण : मुंबई

उप सचिव (सरळ सेवा)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग